## निम्नस्तर लिपीक(लेखा) या पदाच्या ऑनलाईन परिक्षेसाठीचे परिक्षापत्र/प्रवेशपत्र Download करण्याकरीता लिंक (Link)

**संदर्भ :- १. दि. १६.०५.२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले सुचनापत्र**

**२. दि.२१.०५.२०१६ रोजी प्रसिध्द करण्यात आलेले सुचनापत्र**

---------

संदर्भांकित सुचनापत्र क्र.१ अन्वये निम्नस्तर लिपीक (लेखा) पदांसाठीची ऑनलाईन लेखी परिक्षा ही दि. ०३.०६.२०१६ रोजी आयोजित करण्यात आल्याचे कळविण्यात आले होते.

२. ऑनलाईन परिक्षा प्रवेशपत्र (Call Letter) Download करण्याकरीता लिंक (Link) या सुचनापत्राच्या शेवटी उपलब्ध करुन देण्यात आली आहे. ऑनलाईन अर्ज यशस्वीरित्या सादर केलेल्या उमेदवारांनी प्रवेशपत्र (Call Letter) Download करुन ते परिक्षेस हजर राहण्यापूर्वी काळजीपुर्वक वाचावे.

*"प्रवेशपत्र (Call Letter) Download करण्याकरिता शेवटी उपलब्ध करून देण्यात आलेल्या लिंक (Link) वर Click करून **"विद्यमान वापरकर्ता प्रवेश पत्र डाउनलोड करण्यासाठी येथे लॉगिन करा"** या शीर्षकाखाली आपला नोंदणी क्रमांक (Registration Number) व पासवर्ड (Password) नमूद करून प्रवेशपत्र Download करावे."*

*उमेदवारांनी ऑनलाईन अर्जात नमूद केलेल्या ई-मेल पत्त्यावर प्रवेशपत्राची प्रत पाठविण्यात येत आहे.*

३. ऑनलाईन परिक्षा प्रवेशपत्र (Call Letter) Download करताना काही तांत्रिक अडचणी आल्यास त्या संबंधी उमेदवारांनी **022-42040240, 022-42040188** या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा अथवा **callletter_helpdesk@mahatransco.in** या ई-मेल पत्त्यावर आपली समस्या नोंदवावी /पाठवावी. सदर ई-मेल हा दि.०३.०६.२०१६ (१४.०० वाजेपर्यंत) कार्यरत राहील.

४. माहिती पुस्तिका (Information Handout) Download करण्याकरिता व ऑनलाईन पहाणी चाचणी (Mock Test / Demo) करिता स्वतंत्र सूचना पत्र (Notification) लवकरच जारी करण्यात येईल.

५. ऑनलाईल परिक्षेची तारीख, वेळ व ठिकाण याबाबतची माहिती परिक्षा प्रवेशपत्रावर (Call Letter) देण्यात आली आहे.

६. ऑनलाईन अर्ज यशस्वीरित्या सादर केलेल्या सर्व उमेदवारांना ऑनलाईन परिक्षेस बोलविण्यात येत आहे. ऑनलाईन लेखी परिक्षेस उमेदवारांना बोलविण्यापुर्वी त्यांच्या पात्रतेची म्हणजेच वय, शैक्षणिक अर्हता इ. बाबतची पडताळणी करण्यात आलेली नाही. सबब, उमेदवाराने ऑनलाईन परिक्षेकरीता हजर होण्यापुर्वी जाहिरातीत नमूद केलेल्या सर्व अर्हता जसे की, वय, शैक्षणिक अर्हता, कागदपत्रे वगैरे धारण करत असल्याची खात्री करावी.

### ७. ऑनलाईन परिक्षेस हजर राहण्याबाबतच्या सुचना:-

ऑनलाईन परीक्षेस हजर होताना उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे कागदपत्रे सादर करणे अनिवार्य राहिल अन्यथा उमेदवारास परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१) ऑनलाईन परिक्षेस उपस्थित राहण्याबाबत महापारेषण कंपनीने जारी केलेले वैध परिक्षा प्रवेशपत्र (Call Letter).

२) खाली नमूद केलेल्या प्रमाणपत्रांपैकी सद्यस्थितीत वैध असलेले कोणतेही एक मूळ फोटो ओळखपत्र (Original Photo Identity Proof) व त्याची एक छायांकित प्रत आणने बंधनकारक आहे. **फोटो**

**ओळखपत्राची मूळ प्रत आवश्यक राहील.** रंगीत प्रत (Colour Copy) / नक्कल ओळखपत्र (Duplicate Identity Card) ग्राह्य धरले जाणार नाही.

*"पॅन कार्ड (PAN Card) / पासपोर्ट (Passport) /वाहन परवाना (Driving License) / मतदार ओळखपत्र (Voter's Card) / अलीकडचे छायाचित्र असलेले बँकेचे पासबूक (Bank Passbook with photograph) / राजपत्रित अधिकाऱ्याने अधिकृत letterhead वर जारी केलेले अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र / लोकप्रतिनिधिने अधिकृत letterhead वर जारी केलेले अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र / मान्यताप्राप्त महाविद्यालय / विद्यापिठाकडील अलीकडचे छायाचित्र असलेले ओळखपत्र (valid recent Identity Card issued by a recognized college / university) / छायाचित्र असलेले आधार कार्ड (Aadhar card with a photograph) / कर्मचारी ओळखपत्र (Employee ID) / अलीकडचे छायाचित्र असलेले बार कॉंसीलचे ओळखपत्र (Bar Council Identity card with photograph)"*

**३) महिला उमेदवारांसाठी:-**

महिला उमेदवारांचे परिक्षा प्रवेशपत्रा (Call letter) मध्ये नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतिचे नाव, आडनाव व छायाचित्र ओळखपत्रावर नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे/पतिचे नाव व आडनाव हे एकसमान असणे आवश्यक आहे. ज्या महिला उमेदवारांचे परिक्षा प्रवेश पत्रा (Call letter) मध्ये नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे / पतिचे नाव, आडनाव हे छायाचित्र ओळखपत्रावर नमूद केलेले प्रथम नाव, वडिलांचे/पतिचे नाव व आडनाव पेक्षा वेगळे असेल अशा महिला उमेदवारांना परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

४) ऑनलाईन परिक्षेसाठी विहीत केलेल्या वेळेनंतर (म्हणजेच प्रवेशपत्रात (Call letter) नमूद केलेल्या परिक्षा केंद्रावर हजर राहण्याच्या वेळेनंतर) कोणत्याही कारणास्तव उशिराने हजर होणाऱ्या उमेदवारास परिक्षेस बसू दिले जाणार नाही.

५) परिक्षा केंद्रावर भरती प्रक्रियेसंबंधीच्या विविध औपचारिकता पूर्ण करण्याच्या दृष्टीने अर्जदाराने परीक्षा प्रवेश पत्रात (Call letter) नमूद केलेल्या हजर राहण्याच्या वेळेच्या आधीच परिक्षाकेंद्रावर उपस्थित राहणे अपेक्षीत आहे.

**6) ओळख पडताळणी:-**

परिक्षा केद्रांवर /परिक्षा सभागृहात उमेदवारास परीक्षा प्रवेशपत्र (Call letter), मूळ छायाचित्र ओळखपत्र (Original Photo Identity Proof) व त्याची छायांकीत प्रत (Photo Copy) पर्यवेक्षकाकडे सादर करावी लागेल. उमेदवाराच्या ओळखीची पडताळणी ही त्याने/तिने सादर केलेली कागदपत्रे तसेच हजेरीपट यावरून करण्यात येईल. त्यामध्ये उमेदवार स्वत:ची ओळख सिध्द करण्यास असमर्थ ठरल्यास अशा उमेदवारास परिक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.

***८. औरंगाबाद परिक्षा केंद्राच्या क्षमतेचा विचार करता सदर परिक्षा केंद्राची निवड केलेल्या काही उमेदवारांना अहमदनगर परिक्षा केंद्रावर ऑनलाईन परिक्षेकरीता वर्ग करण्यात आले आहे.***

९. उमेदवाराने ऑनलाईन परिक्षेस स्वत:च्या जोखीमवर उपस्थित रहावे. महापारेषण कंपनी कोणत्याही प्रकारच्या दुखापतीस अथवा हानीस जबाबदार राहणार नाही.

- **परिक्षा प्रवेशपत्र Download करण्याकरिता येथे Click करावे.**
- **लेखनिक वापरण्यासाठी अपंग उमेदवारांना मार्गदर्शक तत्वे / GUIDELINES FOR PERSONS WITH DISABILITIES CANDIDATES USING SCRIBE**

**ठिकाण: मुंबई** **सही/-**

**दि. २३.०५.२०१६** **मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

******